REGISTERED No. B. 3134




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ पुणें, बुधवार तारीख १७ मार्च १९४८ अंक ९


## दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

हेड ऑफिसः—पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, ओझर ( जि. नाशिक ), खोपोली पे ऑफिसः

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | ... | रु. ७,९३,८१० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ३,९६,२४५ |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ५५ लाखांचेवर |

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B. (वकील)

- गतवर्षी ऑर्डिनरी शेअर्सवर चार टक्के अधिक अर्धा टक्का करमाफ डिव्हिडंड दिलें.
- मुंबई, नगर, नाशिक, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे ठिकाणीं डिमांड ड्राफ्टस् दिले जातात.
- बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एन. एन. क्षीरसागर,
आर. बी. साळवेकर,
बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.

## दि रत्नाकर बँक, लि.

स्थापना : १९४३

—: शाखा :—

( १ ) कोल्हापूर, ( २ ) शाहुपुरी, ( ३ ) सांगली, ( ४ ) मिरज, ( ५ ) जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | ... | २०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | ६,६७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ३,१३,६०० |
| रिझर्व्ह फंड | ... | २०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ३८,००,००० |

*—अद्यावत बँकिंग व्यवहार केले जातात—*

नामदार बी. बी. पाटील. B. A., LL. B., डेव्हलपमेंट मिनिस्टर, सांगली स्टेट. चेअरमन

श्री. गं. सि. चौगुले. M. L. A. कोल्हापूर व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा.
B. Com., C. A. I. I. B.

तयार व.पड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें










# विविध माहिती

**वॉशिंग्टन शहराचा १५० वा वाढदिवस**—वॉशिंग्टन शहर १८०० साली अमेरिकेची राजधानी बनलें. ह्या गोष्टीस १९५० साली १५० वर्षे पुरीं होतील. त्यानिमित्त १९५० सालीं उत्सव साजरा करण्यांत यावयाचा आहे त्याच्या कमिशनचे प्रे. ट्रुमन हे अध्यक्ष आहेत.

**स्वतःचा धंदा असणाऱ्या स्त्रिया**—स्वतःच्या मालकीचा व्यवसाय, उद्योगधंदा, व्यापार इत्यादि असलेल्या १० लक्ष स्त्रिया अमेरिकेंत आहेत. ३ लक्ष स्त्रियांचीं स्वतःचीं शेतें आहेत. नोकरी करणाऱ्या स्त्रियांचा ह्यांत समावेश होत नाहीं.

**हिंदुस्थान-पाकिस्तान रिझर्व्ह बँक बैठक**—पाकिस्तान सरकारचें स्वतःचें चलन १ एप्रिलपासून सुरू होईल. त्याची स्वतःची मध्यवर्ती बँकहि लवकरच स्थापण्यांत येईल. रिझर्व्ह बँकेच्या जिंदगीपैकी व देण्यापैकी पाकिस्तानचा हिस्सा काय होईल ह्याबाबत बोलणीं करण्यासाठी हिंदी, पाकिस्तानी व रिझर्व्ह बँकेच्या प्रतिनिधींची बैठक गेल्या आठवड्यांत मुंबई येथें भरली होती.

**बँकांच्या राष्ट्रीयीकरणाबद्दल हळहळ**—"व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची तूर्त तरी भीति नाहीं, हें अर्थमंत्र्यांच्या भाषणावरून स्पष्ट झालें आहे. परंतु, रिझर्व्ह बँक आणि इंपीरिअल बँक ह्यांचें राष्ट्रीयीकरण करण्याचें ठरलें, हें ऐकून वाईट वाटतें. कारण, सरकारची खात्री ह्या दृष्टीनें त्यांची आजची कार्यक्षमता, तत्परता इत्यादि टिकणें शक्य दिसत नाहीं.":—देवकरण नानजी बँकिंग कं. लि. चे अध्यक्ष, श्री प्राणलाल देवकरण नानजी.

**बुटांच्या कारखान्यांची पुनर्घटना**—आग्रा येथील बुटांच्या कारखान्यांची पुनर्घटना करण्यांत येणार आहे असें समजतें. ह्या कारखान्यांतून एकूण ४० हजारावर मजूर काम करीत आहेत. मजुरांची परिस्थिति सुधारण्याच्या दृष्टीनें व धंद्यांतील अडचणी समजून घेण्यासाठी म्हणून संयुक्त प्रांताचे उद्योगमंत्री आग्र्याला जाणार आहेत.

**सोव्हिएट व्याप्त जर्मनी आणि हिंदुस्थान**—जर्मनीच्या सोव्हिएट रशिआनें व्यापलेल्या भागांत आणि हिंदुस्थानांत नुकतीच एक देवाणघेवाण झाली. लाइप्झिक येथें भरलेल्या औद्योगिक प्रदर्शनांत श्री. लाल ह्या व्यापाऱ्यानें छपाईची कांहीं यंत्रसामग्री विकत घेण्याचा करार केला. ह्या यंत्रांची किंमत ४० हजार पौंड असून यंत्रें सहा महिन्यांत पुरविण्याचें ठरलें आहे.

**हिंदुस्थान-पाकिस्तान बदला करार**—हिंदुस्थान सरकार आणि पाकिस्तान सरकार ह्यांचे दरम्यान कापड देऊन मध्यम व लांब धाग्याचा कापूस घेण्याचा करार झाला आहे असें समजतें. हिंदुस्थानकडून मिळणाऱ्या कापडाच्या प्रत्येक १२ गांठींचा बदला पाकिस्तानकडून २० गाठी कापूस मिळणार आहे. पाकिस्तानांतून निर्यात होणाऱ्या प्रत्येक कापसाच्या गठीस ६० रु. निर्यात-कर द्यावा लागतो. उलट हिंदुस्थानांतून निर्यात होणाऱ्या कापडाच्या गाठीवर सरासरी १५० रु. कर द्यावा लागतो. करांचें हेंच प्रमाण चालू रहाणार आहे.

**मद्रास प्रांतांत आरोग्य-केंद्र**—मद्रास प्रांताच्या सरकारनें प्रांतांतील जनतेचें आरोग्य सुधारण्याची एक पंचवार्षिक योजना हातीं घेतली असून त्यांतील पहिल्या वर्षाचा कार्यक्रम ह्या वर्षी अंमलांत येणार आहे. येत्या पांच वर्षांत प्रांतांत १५० आरोग्य-केंद्रें उघडण्यांत येणार आहेत.

**झेकोस्लोव्हाकिया-हिंदुस्थान व्यापार**—झेक सरकारच्या परदेशीय व्यापार खात्यानें परराष्ट्रांशीं व्यापार वाढविण्याचे विशेष प्रयत्न करण्याचें ठरविलें आहे. झेक सरकारच्या मुंबई येथील प्रतिनिधीनें, हिंदुस्थानशीं व्यापार करण्यास झेक सरकार विशेष उत्सुक आहे असें नुकतेंच बोलून दाखविलें.

**सौंदर्य प्रसाधनांवर कर**—सुरत म्युनिसिपालिटीच्या हद्दींत आयात होणाऱ्या सौंदर्य प्रसाधनांच्या किंमतीवर दर १०० रुपयांवर ४ रु. ११ आ. कर घेण्याचें सुरत म्युनिसिपल बोर्डानें ठरविलें आहे.

**हिंदी उद्योगधंद्यासाठी जर्मन तज्ज्ञ**—जर्मनीला गेलेलें हिंदी लष्करी मंडळ हिंदी उद्योगधंद्यासाठी जर्मन तज्ज्ञांची भरती करीत आहे. जगांतील निरनिराळ्या देशांतूनहि असे तज्ज्ञ मिळविण्याची मिशन खटपट करीत आहे. तथापि जर्मन तज्ज्ञ मिळाले तर ते अधिक चांगले, असें मंडळाचें मत आहे. हे तज्ज्ञ राजकीय दृष्ट्या अलित असावेत अशी काळजी घेण्यांत येत आहे. हिंदुस्थानच्या निरनिराळ्या उद्योगधंद्यांना उपयोगी पडणारी तज्ज्ञ मंडळी तयार करण्याचा हेतु ह्या भरतीच्या मागें आहे.

**इंग्लंडचा कापड धंदा**—१९४८ साल अखेर ब्रिटनमधील कापडाच्या गिरण्यांतून काम करणाऱ्या कामगारांची संख्या २,६५,०००वरून ३,३५,०००पर्यंत वाढविण्याचें ठरलें आहे. येत्या सहा महिन्यांत विणकामाच्या व सूत कातण्याच्या विभागांत ४० हजार कामगारांची भरती करण्यांत येणार आहे. ह्या ४०हजारांपैकीं १०,००० परदेशीय कामगार असतील; १०,००० इतर धंद्यांतून भरती करण्यांत येतील आणि १०,००० स्त्रिया कामावर घेण्यांत येतील. मुलें असणाऱ्या स्त्रियांच्या उपयोगासाठी शिशुगृहांची सोय करण्यांत येणार आहे.

**आयडियल ड्रग्स लि., मुंबई**—डॉ. जी आर. कोकटनूर ह्यांच्या अध्यक्षतेखालीं औषधनिर्मिती करणारी वरील कंपनी स्थापन झाली आहे.

**कॉफी पिकविणारांसाठी**—कानडा जिल्ह्यांत कॉफी पिकविता येणें शक्य असून त्यासाठी सरकारनें उत्तेजन द्यावें अशा प्रकारच्या सूचना मुंबई सरकारकडे करण्यांत आल्या होत्या. मुंबई सरकारनें ह्या संबंधांत दोन तज्ज्ञ अधिकारी नेमून पुढीलप्रमाणें माहिती मिळविली आहे. कॉफीच्या दोन जाती असून त्यांपैकीं अरेबिअन कॉफी हीच जगांत सध्या ९० टक्के होते. दुसरी कांगो जातीची कॉफी निरनिराळ्या हवामानांत होत असल्यानें ती आतां अधिक प्रमाणांत लावण्यांत येत आहे. कॉफीचे मळे समुद्राकडून येणाऱ्या वाऱ्यापासून संरक्षित असावेत. ह्या पिकाला एप्रिल व मेमधील पाऊस मिळणें जरूर असतें. साधारणपणें कमींत कमी ५० इंच पाऊस औवश्यक असतो. दंव पाडणारी हवा मात्र चालत नाहीं. अरेबिअन कॉफी समुद्रसपाटीपासून २,००० ते ३,५०० फूट उंचीवरच येऊं शकते. कांगो कॉफी मात्र १,६०० फुटांवर होऊं शकते. सरकार कॉफीच्या मळ्यांसाठी खंडानें जमीन देण्यास तयार आहे. पण, मळ्याच्या यशस्वितेची जबाबदारी अर्थातच ज्याची त्यानें घ्यावयाची आहे.

**कॅलेंडराची साभार-पोंच**—राजवैद्य गुणे ह्यांचा शाहू आर्यौषधि कारखाना लि. कोल्हापूर, ह्यांचें उत्कृष्ट चित्रांचें १९४८ चें कॅलेंडर.

**अमेरिकेचें राष्ट्रीय कर्ज**—अमेरिकेनें गेल्या दोन वर्षांत आपलें राष्ट्रीय कर्ज २५ अब्ज डॉलर्सनी कमी केलें. आतां २५५ अब्ज डॉलर्सचें कर्ज अद्याप शिल्लक आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १७ मार्च १९४८

संपादक :
**श्रीपाद वामन काळे**

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.





प्रो. वा. गो. काळे

## संस्थानी हद्दींतील कारखानदारांच्या सवलती

### विलिनीकरणामुळें निर्माण झालेला महत्त्वाचा प्रश्न

मुंबई सरकारनें १६ संस्थानांचा राज्यकारभार ता. ८ रोजीं आपल्या हातीं घेतला. ह्या संस्थानांत अक्कलकोट, औंध, भोर, जमखिंडी, जत, कुरुंदवाड ( थोरली व धाकटी पाती ), मिरज (थोरली व धाकटी पाती),मुधोळ, फलटण, रामदुर्ग, सांगली, सावनूर, सावंतवाडी, वाडी जहागीर, ह्यांचा समावेश होतो. ह्यांपैकीं कित्येक संस्थानांनीं औद्योगीकरणास उत्तेजन मिळावें व संस्थानाचाहि फायदा व्हावा ह्या दृष्टीनें कारखान्यांच्या स्थापनेस व वाढीस पोषक अशा सवलती दिलेल्या आहेत. त्याचा बऱ्याच कारखान-दारांनीं फायदा घेऊन, कोट्यावधि रुपये संस्थानी हद्दींत गुंतवले. प्रांतिक सरकारापेक्षा संस्थानी सरकारांशीं वाटाघाटी करून निर्णय मिळवणें सोपें जातें आणि संस्थानें व कारखानदार ह्या दोघांसहि फायदेशीर असे करार घडवून आणता येतात, असा कारखानदारांना अनुभव आला. अशा रीतीनें, कारखानदारांनीं तात्कालिक कांहीं गैरसोई सोसूनहि अंतिम हिताच्या दृष्टीनें संस्थानी सरकारांशीं करार करून तेथें वेगवेगळे कारखाने काढले. महाराष्ट्रीय संस्थानांत वरील पद्धतीनें निघालेले यशस्वी आणि उद्योन्मुख असे कित्येक कारखाने व गिरण्या वाचकांच्या नजरेसमोर येतील.

कांहीं संस्थानांनीं विशिष्ट कारखान्यांस दीर्घ मुदतीची मोनापली देऊन तत्सम दुसऱ्या कारखान्यास परवानगी मिळणार नाहीं असें जाहीर केलें. कारखान्याच्या कामाच्या उपयोगाकरितां घेतलेल्या जमिनींवर बिगर शेतीच्या आकाराची माफी दिली. नद्यांचे पाण्याचा उपयोग विनामूल्य करण्यास परवानगी दिली. इनकम टॅक्सचे बाबतींत अनेक सवलती दिल्या. कांहीं कंपन्यांना पहिलीं कांहीं वर्षें ग्रँटहि देण्यांत आल्या. उलटपक्षी, कारखाने काढणाऱ्या कंप-न्यांनीं कांहीं बंधनेंहि पत्करलीं. संस्थानी दरबारचे प्रतिनिधी आपल्या डायरेक्टर बोर्डांवर अधिकारपरत्वें म्हणून स्वीकारले, आणि प्रारंभींच्या वर्षांच्या जादा सवलतींची भरपाई कांहीं वर्षांनीं करणाऱ्या अटी त्यांनीं मान्य केल्या. ज्यावेळीं ब्रिटिश हद्दींतहि कारखाने काढण्याचें व त्यांत भांडवल गुंतविण्याचें धाडस महारा-ष्ट्रीयांस होत नसे, त्या वेळीं संस्थानी हद्दींत प्रवेश करून महा-राष्ट्राच्या ओद्योगीकरणाचें पाऊल पुढें टाकण्यास व त्याबाबत आत्मविश्वास निर्माण करण्यास कांहीं प्रमुख कारखानदारांनीं तर फारच मोठा हातभार लावलेला आहे.

संस्थानांच्या विलिनीकरणानंतर संस्थानें हीं हिंदी यूनियनच्या अधिकार क्षेत्रांत आलीं आहेत. प्रांतिक सरकारचे अधिकारी त्यांचा कारभार पाहूं लागले आहेत. म्हणजे, संस्थानें हीं प्रांताचाच भाग बनलीं आहेत. ह्या बदललेल्या परिस्थितींत संस्थानें व कारखानदार ह्यांचेमधील करार कायम रहातील किंवा नाहीं, असा प्रश्न आतां उपस्थित झाला आहे. हे करार कायम राहिले पाहिजेत, असें त्या करारांची पार्श्वभूमि लक्षांत घेता, कोणीहि म्हणेल.

मुंबई प्रांताच्या अधिकारक्षेत्रांतील एका कारखान्यास एक व दुसऱ्या कारखान्यास दुसरा नियम, असें ह्यांत होणार आहे व एकापेक्षां दुसऱ्यास अधिक सवलती मिळणार आहेत, असा आक्षेप येण्याचा संभव आहे. परंतु त्या सवलतींसाठीं कारखान्यांनीं कांहीं गैरसोई सोसण्याची किंमतहि दिलेली आहे, हें विसरून चालणार नाहीं. संस्थान हा एक स्वतंत्र घटक राहील ह्या दृष्टीनें कांहीं कंपन्यांनीं आपल्या कारखान्याची जागा निवडली आहे; त्यांच्या सवलती नष्ट झाल्या तर नव्या राजवटींत कारखान्यांची जागा मात्र वहातुक वगैरे दृष्टीनें गैर-सोईची व खर्चाची होईल आणि त्याची भरपाई मात्र होऊं शकणार नाहीं. कारखान्यांस मिळालेल्या सवलती ह्या कायम स्वरूपाच्या नाहींत; त्या सर्वांस वेळेचें बंधन आहे. कित्येक कंप-न्यांच्या सवलती रद्द होण्याचीहि वेळ येऊन ठेपली असेल तर कांहींना त्याचा फायदा मिळण्यास नुकताच प्रारंभ झाला असेल. कांहीं कंपन्यांनीं मात्र प्राथमिक कार्य पुरें करून भांडवल गुंतविलें आहे, त्याचें फळ अद्याप मिळूं लागलेलें नाहीं. संस्थानी सरकारांनीं दिलेल्या सवलती कायम चालू रहातील अशी कारखानदारांची कधीं अपेक्षा असली तरी त्याबाबत आज कोणीच मागणी करणार नाहीं; मूळ सवलती त्यांच्या कालमर्यादा संपेपर्यंत चालू रहाव्यात एवढीच त्यांची साधी व न्याय्य मागणी आहे. संस्थानी सरकारांचे जागीं हिंदी सरकार आतां आलें असल्याकारणानें, संस्थानी सरकारांस मूळ करारांप्रमाणें मिळावयाचे कर वगैरे मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांस मिळत राहूं शकतील, हें उघड आहे.

संस्थानी हद्दींत प्रवेश करून महाराष्ट्रीय कंपन्यांनी भरमसाट नफे मिळवलेले आहेत, असें कोणीच म्हणूं शकणार नाहीं. उद्योग-प्रियतेच्या त्यांच्या गुणास संस्थानी हद्दींत अवसर सांपडला एवढाच त्यांतला सत्यांश आहे. कंपन्यांना मिळालेल्या कांहीं महत्त्वाच्या सवलतींचा संबंध हिंदुस्थान सरकारशीं येतो, तर कांहीं इतर सवलतींचा संबंध मुंबई सरकारशीं येतो. विलिनीकरणानंतर ह्या सवलती कायम रहाणें कंपन्यांच्याच व त्यांच्या भागीदारांच्याच केवळ हिताच्या दृष्टीनें नव्हे तर औद्यो-गीकरणाच्या व्यापक दृष्टीनेंहि अत्यावश्यक आहे. ह्या बाबत सरकारकडून सत्वर योग्य खुलासा प्रसिद्ध होईल अशी अपेक्षा आहे. मूळ संस्थानी हद्दींतील कारखाने विरुद्ध मूळ ब्रिटिश हद्दींतील कारखाने, अशी तेढ निर्माण होण्याचें कांहींहि कारण नाहीं. महाराष्ट्रीय कारखानदारांप्रमाणें इतर ठिकाणच्या कांहीं कारखानदारांपुढेंहि थोड्याफार प्रमाणांत हा प्रश्न उभा असणारच. तेव्हां ह्या बाबतींतले मूळ करार पाळले जातील, असें आश्वासन सरकारनें सरळ जाहीर करावें. संस्थानी सरकारांचे इतर बाबींतले करार जर पुढें चालू रहातील तर कंपन्यांशीं केलेले करारहि चालू राहिलेच पाहिजेत, हें वाजवी आहे; सरकारहि न्याय्य तेंच धोरण पत्करील असेंच मानण्यास जागा आहे.

---

## इंग्लंडकडील आपल्या येण्याची वसुली

### कायम स्वरूपाचा करार लवकरच होणार

इंग्लंडकडून हिंदुस्थानच्या येणें असलेल्या स्टर्लिंग कर्जाबद्दल उभयतां देशांमध्यें दुसरा तात्पुरता करार जून, १९४८ पर्यंतचा करण्यांत आलेला आहे, व हिंदचे अर्थमंत्री ह्या येण्याबद्दल कायमचा करार करावयास मे महिन्यांत इंग्लंडला जातील अशी बातमी प्रसिद्ध झाली आहे. मध्यंतरी रॉयटरनें अशीहि बातमी प्रसिद्ध केली आहे कीं येणें असलेल्या ११० कोटी पौंड रकमेपैकीं, हिंदुस्थानांतील ब्रिटिश लष्करी सामानाची किंमत, ब्रिटिश नोकरांचीं पेन्शनें, इत्यादि स्वरूपाच्या रकमा वजा जातां, इंग्लंडकडून येणें असलेली रक्कम फक्त ४० कोटि पौंड राहील. या बातमींत किती तथ्य आहे. तें निश्चित समजत नाहीं. परंतु जून अखेरपर्यंत झालेल्या तडजोडीच्या दृष्टीनें कांहीं विचार व्यक्त करणें योग्य ठरेल.

चालू वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत, इंग्लंडनें गेल्या वर्षी हिंदुस्थानला दिलेल्या ६३ कोटी पौंडांच्या शिलकीपैकीं रक्कम पुढें चालू राहून आणखी १.८ कोटी पौंड दिले जातील. परंतु पूर्वीच्या ६३ कोटी पौंडांपैकीं शिल्लक व नवीन १.८ कोटी पौंड यांपैकीं फक्त १ कोटी पौंड रकमेचा उपयोग डॉलरमध्यें रूपान्तरित करण्याची परवानगी आहे. नवीन करारांतील ही अट, आपल्या व्यापाराच्या दृष्टीनें, आपली निव्वळ आयात १ कोटी पौंड किंमतीपर्यंतच डॉलर गटाशीं राहील असें बंधन घालीत आहे. विशेषतः गेलीं कांहीं वर्षे अमेरिकेशींहि आपला आयात व्यापार प्रतिकूल तफावत दाखवीत आहे. ही गोष्ट अर्थ-मंत्र्यांनीं बजेटावरील आपल्या भाषणांत स्पष्ट केली आहे. यावरून असें स्पष्ट होतें कीं इंग्लंडकडून मिळणारी थोडीबहुत स्टर्लिंग-बाकी, डॉलरमध्यें रूपान्तरित करणें शक्य नसल्यामुळें, आपणाला आपल्या डॉलर-गटाशीं चालणाऱ्या व्यापाराची प्रतिकूल तफावत भरून काढण्यासाठीं अमेरिकेकडून कर्जे तरी काढावें लागेल, किंवा अशा देशांतून दीर्घ मुदतीच्या करारानें उधारी माल घ्यावा लागेल, किंवा डॉलर-गटाच्या देशाशीं चालणारा व्यापार म्हणजेच आपली आयात कमी करावी लागेल, किंवा शक्य तितका स्टर्लिंग गटाशीं व्यापार वाढवावा लागेल. सारांश, परराष्ट्रीय व्यापाराच्या प्रतिकूल तफावतीच्या दृष्टीनें जून अखेर पर्यंत करण्यांत आलेली योजना विशेष उपयोगी ठरेल असें वाटत नाहीं. या परिस्थितींतून मार्ग काढावयाचा म्हणजे आपण इंग्लंडवरच व स्टर्लिंग गटाशीं व्यापारासाठीं जास्त अवलंबून रहाणें परिस्थितीमुळें अपरिहार्य ठरणार आहे. परंतु असें करणें प्रत्यक्ष किती प्रमाणांत शक्य आहे याचा विचार केला असतां निराशाच दिसते. कारण सध्यां अमेरिकेकडून किंवा डॉलर-गटाकडून आपण यंत्रसामुग्री व धान्य यांची आयात प्रामुख्यानें करीत असल्यामुळें हा माल आपणाला आपल्या गरजेइतका इंग्लंड किंवा इतर स्टर्लिंग गटापैकींहि देश पुरवूं शकत नाहीं. यामुळें अमेरिकेवर तर अवलंबून राहावें लागणारच व अमेरिकेचें देणें फेडण्यासाठीं आंतरराष्ट्रीय चलन निधींतून मिळाल्यास कर्ज काढावें लागणार किंवा अमेरिकेशीं परावलंबीपणाचे आर्थिक संबंध मान्य करावे लागणार.

१९४८ च्या पहिल्या सहामाहींत ( जानेवारी ते जून अखेर ) हिंदुस्थानच्या आयात व्यापाराचें स्वरूप १९४७ च्या डिसेंबर अखेरच्या सहामाही प्रमाणेंच असेल असें नाहीं. गेल्या वर्षी आयातीवरील निर्बंधांमुळें व अंतर्गत राजकीय परिस्थितीमुळें आपली आयात कमी प्रमाणांत झाली, व चालू वर्षाच्या पहिल्या सहामाहींत ही आयात आर्थिक जीवनाच्या तृप्तीसाठीं कांहीं प्रमाणांत वाढणेंच जास्त संभवनीय आहे. अशा वेळीं स्टर्लिंग कर्जापैकीं जी थोडीशी रक्कम येणार त्यापैकीं फक्त १ कोटी पौंडांचें रूपान्तर डॉलर्समध्यें करतां येण्याचें बंधन अपुरें व आपल्या व्यापारी गरजेच्या दृष्टीनें असमाधानकारक आहे.

एकंदरीत, स्टर्लिंग कर्जाच्या परत फेडीबद्दल इंग्लंडचें धोरण अगदीं दिरंगाईचें दिसतें. अर्जेंटिना, इजिप्त, आयर इ. देशांशीं इंग्लंडनें स्टर्लिंग कर्जाच्या परतफेडीबद्दल जास्त दिलदार स्वरूपाचे व त्यांच्या विशिष्ट गरजा लक्षांत घेऊन करार केले आहेत. परंतु हिंदशीं केलेली व्यवस्था मात्र एखाद्या फार मोठ्या फाटलेल्या वस्त्राला लहानसें ठिगळ जोडल्याप्रमाणें दिसतें. तेव्हां आपल्या अर्थ-मंत्र्यांनीं स्टर्लिंगच्या परतफेडीबद्दल विशेष विचारपूर्वक आपली योजना मांडणें आवश्यक आहे.

सांप्रतच्या परिस्थितींत औद्योगिक पुनर्घटनेसाठीं पुष्कळच भांडवली माल, यंत्रसामुग्रीच्या रूपाचा, इंग्लंड आपणाला कांहीं किमान वर्षांच्या मुदतीनें देणें शक्य आहे. अशा तऱ्हेचा माल आपणाला नक्की उपलब्ध होऊं शकेल व त्याची किंमत स्टर्लिंग कर्जातून दिली जाईल. अशा मालाचें स्वरूप, किंमत व डिलिव्हरीची नक्की तारीख दर्शविणारी योजना वाटाघाटी अंतीं ठरविणें अशक्य होणार नाहीं. इंग्लंडची उत्पादनाची अंतर्गत परिस्थिति सुधारत चालली आहे. मार्शल योजनेप्रमाणें इंग्लंडला अमेरिकेकडून कर्जाची मदत मिळणें शक्य आहे. ब्रिटिश कॉमनवेल्थच्या सभासद देशांबरोबर इंग्लंडचे मित्रत्वाचे संबंध आहेत व ते संबंध सर्वच घटक देशांना फायदेशीर व परस्परांच्या अर्थव्यवस्थेला पोषक असेच आहेत. तेव्हां स्वतंत्र हिंदुस्थानचेहि इंग्लंडशीं स्नेहाचे आर्थिक संबंध राहाणें, दोनहि देशांना अंतिम दृष्ट्या फायद्याचें आहे. स्टर्लिंग कर्जाच्या परतफेडीच्या बाबतींत इंग्लंडनें दिलदारपणा दाखविण्याची संधी लवकरच येत आहे. ह्या संधीचा फायदा घेऊन ब्रिटिश अर्थव्यवस्थेचे अधिकारी मनाचा व कृतीचा सरळपणा व्यक्त करतील अशी आशा आहे. स्टर्लिंग कर्जामधून योग्य विचारविनिमयानें कांहीं किरकोळ रक्कम वजा करतां येण्यासारखी असल्यास ( ब्रिटिशांची हिंदुस्थानांतील कांहीं मालमत्ता, पेन्शन्स इ. ) हिंद-सरकार अशी रक्कम खुशीनें वजा करील.

### म्हाताऱ्या डायरेक्टरांवर कायद्याची नाराजी

७० वर्षांचे पेक्षां जास्त वयाच्या म्हाताऱ्यास पब्लिक लिमिटेड कंपनीचा डायरेक्टर रहातां येणार नाहीं, हा इंग्लंडमधील नवा कायदा १ जुलै, १९४८ पासून अंमलांत येईल. कोणत्याहि डायरेक्टराचें वय त्याच्या नेमणुकीचे वेळीं ७० चे वर असतां कामा नये. ७० वें वर्ष लागताच डायरेक्टरानें आपली जागा त्यानंतरच्या वार्षिक सभेचे वेळीं खाली केली पाहिजे. स्पेशल ठराव करून एखाद्या डायरेक्टराची नेमणूक केली आणि त्याचें वय त्या सभेंत जाहीर केलें तर ७० वर्षांची अट त्यास लागू पडणार नाहीं. त्याचप्रमाणें, खाजगी लिमिटेड कंपन्यांचे डायरेक्टर कितीहि म्हातारे असूं शकतील; ते जिवंत असले म्हणजे पुरे !

ब्रिटिश कंपनी कायद्यांत आणखीहि कांहीं दुरुस्त्या होत आहेत. ताळेबंदांतील आकड्यांबरोबर पूर्वीच्या वर्षाचे तुलनात्मक आकडे देणें आतां आवश्यक होणार आहे. खाजगी कंपन्यांना आतांपर्यंत आपले वार्षिक हिशेबाचे तक्ते फाइल करावे लागत नसत ते यापुढें करावे लागणार आहेत. परंतु ह्या नियमास कांहीं अपवाद ठेवलेले आहेत.

## रशियानें रेशनिंग कसें रद्द केलें?

( लेः—श्री. विश्वनाथ त्र्यंबक शेटे, बी. ए., एलएल. बी. )

नुकत्याच संपलेल्या जगड्व्याळ युद्धामुळें जगांतील इतर देशांपेक्षां रशियाचें फार मोठ्या प्रमाणावर सर्व दृष्टींनीं नुकसान झालें आहे. ३/ ३॥ वर्षें रणचंडी रशियाच्या प्रदेशावर आपलें थैमान घालीत असल्यानें व त्याला तोंडही रशियाला एकाकीपणानेंच द्यावें लागल्यानें रशियन मातृभूमीच्या सर्वांगाचा दाह कसा झाला असेल याची कल्पनाच केलेली बरी. या सर्व दिव्यांतून रशिया जिवंतपणें बाहेर पडल्यावर जगांतील इतर देशांतील मुत्सद्यांनीं व अर्थशास्त्रज्ञांनीं असा ठाम कयास केला कीं, रशियाला आतां पुनः डोकें वर काढण्यास व आर्थिक स्थैर्य प्राप्त होण्यास बराच कालावधि लागेल.

युद्धोत्तर इतर देशांतील व विशेषतः इंग्लंड, अमेरिका व फ्रान्स या देशांतील आर्थिक अस्थिरता पाहून रशियाची या बाबतींत गाळणच उडालेली असेल अशी सर्वसामान्य वाचकांची कल्पना होईल. विशेषतः वैभवसंपन्न अशा अमेरिकेंतही वस्तूंच्या वाढत्या किंमती व मध्यंतरी उठविलेलें रेशनिंग पुनः सुरू करण्याची वाटलेली आवश्यकता, या गोष्टींकडे लक्ष दिल्यावर रशियन जनता या आर्थिक गोंधळामुळें विपन्नावस्थेंत सांपडली असेल अशीच कोणाचीही समजूत होईल. परंतु इंग्लंड-अमेरिकेपेक्षां रशियानेंच आपला तोल झट्दिशीं सांवरल्याचें पाहून त्याच्या आर्थिक पद्धतीचें कुतूहल वाटावयास लागतें. रशियाच्या 'न्यू टाईम्स' या सुप्रसिद्ध साप्ताहिकांत, रेशनिंग उठविण्याबाबत इतरही योजना तावडतोब कशा आंखल्या गेल्या यासंबंधीं जें निवेदन आलें आहे तें या दृष्टीनें मोठें बोधप्रद आहे.

रशियाची राज्यव्यवस्था, परराष्ट्रीय राजकारण, सामाजिक पुनर्व्यवस्था व आर्थिक धोरण या सर्वांच्या पाठीमागें एक प्रकारची योजनाबद्धता असते. किंबहुना, रशीयाच्या पंचवार्षिक योजना इतर अनेक देशांना अनुकरणीय झाल्या आहेत. युद्धामुळें रशियन जनतेस चलनवाढीच्या दुष्परिणामाचा फारच त्रास झाला. त्यांतच जर्मन आक्रमकांनीं रशियनव्याप्त प्रदेशांत रशियन चलनासारखें चलन मोठ्या प्रमाणावर प्रसृत करून मूळ चलनाची किंमत कमी केली व बहुसंख्य जनतेची एक प्रकारें आर्थिक उपासमार केली. त्यामुळें युद्ध संपल्याबरोबर रशियन राजकर्त्यांपुढें रूबलची चाललेली घसरगुंडी व त्यामुळें ठराविक वेतन मिळणाऱ्या कामगारांचे होत चाललेले हाल यावर काय उपाययोजना करावी हा प्रश्न प्रामुख्यानें उभा राहिला. इतर देशांप्रमाणें पगारवाढ, महागाई भत्ता व रेशनिंगचे नियम कडक करणें आणि त्यांतील धान्याचेंहि प्रमाण कमी करणें व तज्जन्य काळ्या बाजारास उत्तेजन देणें, या घोंटाळ्याच्या चक्रव्यूहांत रशियानें सांपडून घेतलें नाहीं. ज्या कांहीं थोड्या लोकांनीं युद्धस्थितीचा गैरफायदा घेऊन आपली संपत्ति वाढविली होती व रोख स्वरूपांत नाणेंसंचय करून ठेवला होता त्यांची ती संपत्ति राष्ट्रहितार्थ एकप्रकारें हिरावून घेऊन शेंकडा ९० लोकांची सोय सुखावह रीतीनें करून दिली. मानवी स्वभाव हा येथून तेथून एक प्रकारचाच असल्यामुळें इतर देशांतील लोकांप्रमाणें रशियांतील कांहीं लोकांनीं जर्मन आमक्रणाचा फायदा घेऊन अनेक प्रकारें आपल्या संपत्तिधनांत वाढ करून ठेवली होती. युद्धकालीन चलनाची बेसुमार वाढ झाल्यानें व त्या प्रमाणांत गरजेच्या वस्तूंची निपज न झाल्यानें बहुसंख्य, ठराविक वेतनाच्या लोकांना महागाईचे चटके बसूं लागले व आपलें उत्पन्न व खर्च यांची तोंडमिळवणी करतां न आल्यानें ते बेचैन होऊं लागले. अशा वेळीं राष्ट्रनेत्यांचें जें वास्तविक कर्तव्य असतें तें करण्यास रशियन राष्ट्रनेता स्टॅलिन मुळींच कचरला नाहीं व लेखणीच्या एका फटकाऱ्यासरशी त्यानें १० टक्के त्यांतले त्यांत श्रीमंत असलेल्या लोकांचे जे बँकेंत पैसे होते त्यांची किंमत कमी करून ९० टक्के लोकांचें जीवन सुखावह केलें.

वर सूचित केल्याप्रमाणें युद्ध संपल्याबरोबर रशियानें आपल्या देशाची घडी पुनः नीट बसविण्याकरतां म्हणून एक पंचवार्षिक योजना आंखली; त्यांत शक्य तितक्या लवकर रेशनिंग उठविणें हाही एक कार्यक्रम होता. रशियांत अन्नधान्य व तयार माल अशा दोन्ही वस्तूंचें रेशनिंग होतें. तें रेशनिंग १४ डिसेंबर, १९४७ पासून उठविण्यांत आलें आहे. परंतु हें उठविल्यामुळें जनतेचे अधिक हाल होऊं नयेत, म्हणून जी उपाययोजना करावयास पाहिजे तीही लागलीच अमलांत आणल्यामुळें ही क्रांतिकारक वाटणारी घटना अखेर लोकांच्या हिताचीच ठरणार आहे यांत शंका नाहीं. इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, इटली इत्यादि अनेक देशांतून रेशनिंग न उठतां तें अधिक कडकपणें अमलांत येऊन लोकांच्या अडचणींत भर पडत आहे तर वीस कोटींच्या रशियांत तें उठविल्यामुळें अडचणी कमी होऊन त्यांच्या सुखांत वाढ होत आहे, या दृश्याची मोठी मजा वाटते. रशियानें या बाबतींत जी योजना केली आहे ती पाहिली म्हणजे त्याच्या आर्थिक तत्त्वप्रणालीची खंबीरता आपल्या दृष्टीस पडते.

रशियानें या बाबतींत आपल्या धोरणाचा पाया एका मुख्य गोष्टीवर आधारलेला आहे. देशांतील वाढलेलें चलन कमी करणें हाच या बाबतींत सर्वोत्कृष्ट तोडगा आहे असें हेरून त्यानें जुन्या रूबल ऐवजीं नवीन रूबल प्रचारांत आणण्याचें ठरविलें. त्यामुळें ज्यांनीं जुन्या रूबलचा मोठ्या प्रमाणावर सांठा करून ठेवला होता व ज्यामुळें बाजारांतील वस्तूंची ते वाटेल तशी खरेदी करून भावांची चढत्या प्रमाणावर वाढ करीत व बहुसंख्य लोकांच्या खरेदीच्या कुवतीवर मोठ्या प्रमाणावर ताण पाडीत, त्यांचे सांठे एकप्रकारें कवडी किंमतीचे ठरविले आणि वस्तूंच्या किंमतीला स्थिरता आणली. जुन्या दहा रूबलसला नवीन एकच रूबल मिळेल असा कायदा केल्यानें या सांठलेल्या व संचित केलेल्या रूबलसचा अपायकारकपणा रशियानें नष्ट केला. ज्या बहुसंख्य लोकांजवळ संचित द्रव्य मुळींच नसतें त्यांचें कांहींहि अहित या नवीन घटनेमुळें होणार नसल्यानें उलट रोज श्रम करून दाम मिळविणारे ते लोक असल्यानें व नवीन रूबलच्या किंमतींत पूर्वींच्या रूबलपेक्षां जास्त धान्य अगर माल मिळाल्यानें त्यांना आनंद होणें स्वाभाविकच आहे. उलट, ज्या थोड्या श्रीमंत लोकांनीं जुन्या रूबलसचा सांठा करून ठेवला होता त्यांची नाण्यांची किंमत कमी झाली. परंतु हा गैरफायदा घेण्याचा न्यायतः त्यांना हक्क नसल्यानें व बहुसंख्य लोकांच्या हिताच्या विरुद्ध त्यांच्या नफेबाजीला वाव देणें राष्ट्रहितविरोधी झालें असतें या विचारानें त्यांच्या रोषाची पर्वा न करतां सोव्हिएट रशियानें वर्गविहीन समाजरचनेच्या ध्येयाची एक प्रकारें पूर्तताच केली यांत शंका नाहीं. अल्पसंख्येनें असलेल्या कांहीं मूठभर व्यक्तींजवळ अमर्याद संपत्ति राहूं देणें कसें धोक्याचें आहे हें यावरून वाचकांच्या ध्यानीं येईलच. खाजगी रीतीनें जवळ बाळगलेल्या या नाण्यांतील संपत्तीप्रमाणें बँकेंत ज्यांचे पैसे शिल्लक होते त्यांच्या बाबतींतही हाच न्याय लावला. ज्यांची बँकेंतील रक्कम ३,००० रूबलस होती त्यांच्या पैशाला हात न लावतां त्यांना नवीन रूबलसच्या स्वरूपांत ३,००० रूबलस दिले; परंतु ज्यांची ३,००० रूबलसपेक्षां जास्त रक्कम होती त्यांना मात्र वरील रकमेपेक्षां जास्त असलेली रक्कम १० रूबलसला १ रूबल याच स्वरूपांत मिळाली.

कर्जरोख्यांच्या बाबतींतही अशीच व्यवस्था करण्यांत आली जुन्या कर्जरोख्याऐवजीं नवीन कर्जरोखे देण्यांत आले व त्यांच्या बाबतींतही जुन्या तीन रूबलसला नवीन एक रूबल अशी देवाण-घेवाण करण्यांत आली. यापैकीं बहुसंख्य कर्जरोखे युद्धकालीन खर्चासाठी काढण्यांत आले असल्यानें युद्धाचा भार सर्वांनींच सोसावा व त्यांनलेल्यांत त्याग करावयाचा असेल तर ज्यांनीं पुंजी सांठविली असेल त्यांनीं तो त्या प्रमाणांत जास्त करावा या तत्त्वानें, ज्यांनीं शिल्लक टाकली असेल व कर्जरोखे विकत घेतले असतील त्यांनीं मूळ किंमतीच्या ⅓ रक्कम घेऊन त्याग केला तर तो राष्ट्रहितपोषकच ठरणार या न्यायानें स्वीकारला. (अपूर्ण)

## नव्या भांडवलउभारणीस परवानगी

### अर्जांचें पृथक्करण

एप्रिल १ ते जून ३०, १९४७ पर्यंत एकूण १०५ कंपन्यांना मिळून ५४ कोटी रुपयांची नवीन भांडवल उभारण्याची परवानगी मिळाली. त्यापैकीं २५ कोटींचें भांडवल दूरगामी योजनांसाठी आहे आणि २९ कोटींचें अधिक नजीकच्या योजनांसाठी आहे. एकूण १५० कंपन्यांनीं मिळून ६८ कोटींच्या भांडवलाची परवानगी मागितली होती. औद्योगिक भांडवल उभारणी व बिगर-औद्योगिक भांडवल उभारणी ह्यांचा तपशील पुढीलप्रमाणें आहे.

| | औद्योगिक | कोटी रु. | बिगर-औद्योगिक | कोटी रु. |
|---|---|---|---|---|
| भांडवलासाठी अर्ज | ७२ | ३७ | ७८ | ३१ |
| मंजूर | ६३ | ३० | ४२ | २४ |
| नकार | ९ | ५·४ | ३६ | ५·६ |

परवानगी नाकारण्यांत आलेल्या कंपन्यांत रबराचे कारखाने, ज्या कापडाच्या गिरण्यांना चात्या व माग मिळाले नव्हते अशा गिरण्या, बँका व वहातूक कंपन्या आहेत. त्यांनीं भांडवल उभारणीसाठी केलेले अर्ज पुढील रकमांचे होते. रबर ३ कोटी रु., कापड गिरण्या २ कोटी रु., बँका ४ कोटी रु., वहातूक कंपन्या १ कोटी रुपये.

हिंदी संस्थानांतील ८ कंपन्यांना मिळून ६ कोटी रुपयांचें भांडवल उभारण्याची परवानगी देण्यांत आली. त्यापैकीं औद्योगिक भांडवल ४·९८ कोटी व बिगर-औद्योगिक १·२ कोटी रुपये आहे. ह्या काळांत औद्योगिक भांडवल उभारणीस जी परवानगी दिली तींत २६ निरनिराळ्या प्रकारचे गट पडतात. सर्वांत अधिक भांडवल उभारणी स्थापत्यविषयक कारखान्यांना मिळाली. दुसरा अनुक्रम कापडाच्या व सुताच्या गिरण्यांचा लागतो. त्यांच्या खालोखाल स्ट्रॉ बोर्ड आणि जड रसायनें ह्यांचा नंबर लागतो. बिगर औद्योगिक ४२ कंपन्यांना मिळून २४ कोटींचें भांडवल उभारण्याची परवानगी देण्यांत आली. बिगर औद्योगिक भांडवल उभारणींत ४ गट पडतात. (१) शेती (२) फिनान्स (३) व्यापार (४) वहातुक. ह्यापैकीं दुसऱ्या गटाचा नंबर भांडवल उभारणींत पहिला लागतो. त्याच्या खालोखाल व्यापार व वहातूक कंपन्यांचा गट येतो. दोन इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट कंपन्यांना १० कोटींच्या भांडवलाची परवानगी देण्यांत आली. एका आगबोटीच्या कंपनीला ३ कोटीची परवानगी देण्यांत आली. शेतकीसाठी पूर्वीच्या ब्रिटिश हिंदुस्थानांत असलेल्यां कंपन्यांना मिळून ९५·९ लाख रुपये भांडवल उभारण्याची परवानगी देण्यांत आली. ह्या गटांतील ६ कंपन्यांना मिळून ४८ लाखांची परवानगी देण्यांत आली. त्यांची वाटणी अशी; मळे २७·९ लाख, शेती व जमीन सुधारणा ५८ लाख, डेअरी व मच्छिमारी १० लाख.

## चैनीच्या वस्तूंवरील विक्रीकर दुप्पट झाला

मुंबई प्रांताच्या १९४८-४९ च्या अंदाजपत्रकांतील अपेक्षित तुटीपैकी चैनीच्या वस्तूंवर जादा विक्रीकर बसवून ४० लक्ष रुपयांची भरपाई करण्याचा संकल्प अर्थमंत्र्यांनीं बजेटावरील आपल्या भाषणांत जाहीर केला होताच. ह्या वस्तूंची यादी मागाहून प्रसिद्ध व्हावयाची होती. १९४६ च्या बॉंबे सेल्स टॅक्स ॲक्टांत आतां दुरुस्ती करण्यांत आली आहे. त्याच्या परिशिष्टांत चैनीच्या वस्तूंची यादी दिलेली आहे, ती अशी:—मोटारी, मोटार सायकली, रेफ्रिजरेटिंग व एअर कंडिशनिंग साहित्य, रेडिओ, कॅमेरा, फोटोचीं साहित्यें, दुर्बिणी, सौंदर्यसाधनें, साबणाव्यतिरिक्त इतर सौगंधिक माल, फाउंटनपेन, घड्याळें, गालिचे, ग्रामोफोन व त्याच्या तबकड्या, बंदुकी, दारूगोळा आणि दागिने. विक्रीकर सध्या रुपयांत ६ पै आहे. तो वरील वस्तूंचे बाबतींत १ आणा केला जाईल.

### "चैन" कशास म्हणावें ?

चैनीची वस्तू ठरवितांना "चैन" ह्या शब्दाची व्याख्या अगोदर पाहिली पाहिजे. "मनसोक्त किंवा भरमसाट उपभोग" ह्या अर्थी "चैन" हा शब्द वापरतात. शब्दकोशांत त्याचा दिलेला दुसरा अर्थ "सौख्य किंवा आनंद देणारी कोणतीही बाब" असा आढळतो. चैनीच्या वस्तूंची वरील यादी करतांना मुंबई सरकारनें "मनसोक्त किंवा भरमसाट उपभोग" ह्या अर्थानें "चैन" हा शब्द घेतला असून अशा उपभोगाच्या वस्तूंवरच विक्रीकर दुप्पट केला आहे, असें अर्थमंत्र्यांनीं सांगितलें. सौख्य किंवा आनंद देणाऱ्या जिनसा लोकांना पूर्ववतच मिळत रहाव्या, असेंच सरकारास वाटतें. आता एकादी वस्तू चैनीची आहे किंवा नाहीं, हें प्रत्येकाच्या रहाणीच्या दर्जावर किंवा दृष्टीकोनावर अवलंबून राहील, हें उघड आहे. दृष्टीकोनावर म्हणण्याचें कारण असें कीं रहाणीचा दर्जा उच्च असणें शक्य असूनहि दृष्टिकोन विवक्षित असूं शकतो. "ह्या बिलामागे बैलगाडीची मनोभूमिका आहे. खेडेगांवीं जीवनाच्या दृष्टीनें विचार करता, मोटार लॉऱ्यांस उत्तेजन मुळींच मिळूं नये असें मला वाटतें; मोटार लॉऱ्यांमुळें खेडूत हा एका महत्त्वाच्या उत्पन्नाच्या बाबीस मुकतो." चैनीच्या वस्तूंवरील विक्रीकर वाढवितांना अर्थमंत्र्यांनीं वरीलप्रमाणें उद्गार काढले आहेत, त्यांचें रहस्य त्यांनीं चैनीच्या वस्तूंची जी यादी तयार केली आहे, तिच्यावरून ध्यानांत येईल. साध्या बैलगाडीवाल्याच्या दृष्टीनें ज्या वस्तूंचा उपयोग करणें भरमसाट उपभोगाच्या सदरांत पडतें, त्या वस्तू चैनीच्या समजाव्यात, असें साधारणपणें आतां म्हणतां येईल. श्रीमंतांस त्या वस्तू जीवनास अत्यावश्यक वाटतील, तर मध्यमवर्गीयांस त्या केवळ सौख्यदायक भासतील. परंतु सामान्य खेडुतांस त्या जर निष्कारण चैनीच्या वाटल्या, तर त्या जादा विक्रीकरास पात्र ठरतील. आर्थिक समतेचें उद्दिष्ट गांठण्यासाठीं पद्धतशीर कर-योजनांचा उपयोग केला जाईल असें अर्थमंत्र्यांनीं आपल्या बजेटावरील भाषणांत सांगितलें होतें आणि त्यासंबंधांत तात्त्विक विवेचनहि केलें होतें. त्यास धरूनच करवाढीस पात्र ठरविलेल्या चैनीच्या वस्तूंची यादी आहे हें दिसून येईल.

**ग्रीसमध्यें टक्कल पडलेले लोक अधिक आहेत**—जपानमधील दोघा प्रोफेसरांनीं टक्कल घालविण्याचा एक उपाय नुकताच शोधून काढला आहे असें समजतें. युरोपमध्ये ग्रीस देशांत टक्कल पडलेल्या लोकांची संख्या सर्वांत अधिक असल्यानें अथेन्सहून कांहीं लोकांनीं, ह्या नव्या उपायाची माहिती पुरवावी अशी विनंति टोकिओ चेंबर ऑफ कॉमर्सकडे केली आहे.

दि
प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल
बँ
क
लि.
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

अधिकृत, विकीस काढलेलें
व खपलेलें भांडवल रु. १०,००,००
जमा झालेलें भांडवल रु. ७,११,८९०
खेळतें भांडवल रु. ६६,५०,०००

मुंबई शाखा:–इस्माईल बिल्डिंग, हॉर्नबी रोड, मुंबई १
श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
"बँक शिड्यूल्ड बँक झाली आहे."
श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर
श्री. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर

श्री

दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

युद्धोत्तरकालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण
वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के
डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

## हिंदु-सिलोन व्यापार

हिंदी संघराज्य आणि सिलोन ह्यांच्यामधील व्यापाराबाबत हिंदु सरकारच्या आर्थिक सल्लागारानें एक अहवाल नुकताच तयार केला आहे. भौगोलिक दृष्ट्या सिलोन हिंदुस्थानाला अगदी नजीक असल्यामुळें, सिलोनच्या बाजारपेठेंत हिंदी मालाचें बस्तान बसविण्यास सोपें जाईल हें सहजच आहे. त्यांतून युद्धकालांत सिलोनमध्यें युरोप व इतर देशांतील माल येणें जवळ जवळ अशक्य झाल्यामुळें आतां पुन्हां परदेशी माल तेथें येण्यापूर्वी हिंदुस्थानच्या निर्यात मालाला आपलें बस्तान बसविता येण्याची संधि मिळणार आहे. मात्र त्यासाठी सिलोनच्या बाजारपेठेच्या गरजांचा अभ्यास करून त्याप्रमाणें निर्यात व्यापार वाढविणें जरूर आहे. उदाहरणार्थ, कपसाचें व लोकरीचें कापड त्याचप्रमाणें रेशमाच्या वस्तू ह्या मालाला सिलोनमध्यें चांगली मागणी आहे. ह्या मालाच्या बाबतींत इतर देशांची स्पर्धा हिंदुस्थानला होण्याची फारशी भीति नाहीं.

सिलोन हें हिंदुस्थानप्रमाणेंच शेतकीप्रधान देश असल्यामुळें ह्या उभयता देशांचा परस्परांशीं होणारा व्यापार स्पर्धेच्या स्वरूपाचा होतो. हिंदुस्थान सिलोनपासून जितका माल घेतो त्यापेक्षां अधिक माल तो सिलोनला विकतो. तथापि, इतर देशांशीं होणाऱ्या व्यापारांत सिलोन हा निर्यात अधिक करणारा देश असल्यामुळें ह्या निर्यातीचा फायदा घेऊन हिंदुस्थानकडून सिलोनला बऱ्याच प्रकारचा माल विकत घेता येण्यासारखा आहे. युद्धकालांत हिंदुस्थानांतून सिलोनला निर्यात झालेल्या मालांत पुढील वस्तू प्रामुख्यानें होत्या. कापसाचें कापड, धान्य, डाळी व आटा, मासे, ( डबाबंद सोडून ) फळें व भाजीपाला, मसाल्याचे पदार्थ, पेंड, कॉफी, खतें व ताग. सध्या सिलोनमध्येंही स्थानिक उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न करण्यांत येत असले तरी हिंदुस्थानला अजून ह्या मालाच्या बाजारांत स्थान आहे. कारण हिंदुस्थानांतील माल स्वस्त पडतो. कापसाचें कापड युद्धापूर्वी मुख्यत इंग्लंड व जपान ह्या देशांतून सिलोनमध्यें निर्यात होत असे. युद्धकालांत, १९४३–४४ ह्या वर्षी हिंदुस्थानांतून ३ कोटी, ७० लाख वार कापड सिलोनला गेलें. त्याची किंमत ४ कोटी, ८४ लाख रुपये होती; १९३७–३८ सालीं हिंदुस्थानांतून २ कोटी, ६० लाख वार कापड निर्यात झालें होतें व त्याची किंमत अवघी ९० लाख रुपये होती. सिलोनला तांदूळ व इतर अन्नधान्याची जरूरी आहे; पण अजून कांहीं वर्षे तरी हिंदुस्थान ही गरज पुरवूं शकणार नाहीं.

हिंदुस्थानांतून फळें व भाज्या ह्यांची निर्यात केली गेली तर ह्या पदार्थांची बाजारपेठ हिंदुस्थानला काबीज करता येईल. १९४१ सालापासून ह्या दोन पदार्थांच्या गरजेपैकी ९० टक्के गरज हिंदुस्थानच भागवीत आहे. आतांपर्यंत ताजीं फळेंच मुख्यतः निर्यात झालेलीं आहेत. रेल्वेचे जबर वहातुकीचे दर आणि बाजारपेठेची सदोष संघटना ह्यामुळें डबाबंद परदेशी फळांशीं मात्र हिंदी फळांना तोंड देता आलेलें नाहीं. तथापि रिफ्रिजरेटर्सचा अधिक उपयोग केल्यास ही अडचण दूर करतां येईल. सिलोनच्या किनाऱ्याजवळच्या पाण्यांत खाण्यासारखे मासे विपुल सांपडत नाहींत; त्यामुळें हिंदी माशांनाही सिलोनमध्यें मागणी असते. हिंदी चित्रपटांनाही सिलोनमध्यें चांगला वाव आहे. सिलोनकडून हिंदुस्थानांत आयात होणाऱ्या मालांत नारळापासून बनलेल्या पदार्थांना प्रमुख स्थान द्यावें लागेल. १९४५ सालीं सिलोनच्या ह्या मालाच्या एकंदर निर्यातीपैकी ३५ टक्के माल हिंदुस्थाननें घेतला. त्यांत खोबऱ्याच्या निर्यातीची किंमतच ९६,११,६७९ रुपये झाली. एकूण निर्यातीची किंमत १,६२,७८,५०९ रुपये झाली. खोबऱ्याच्या व नारळाच्या खालोखाल हिंदुस्थान सिलोनकडून मसाल्याचे पदार्थ घेतो. १९३९ ते ४५ ह्या काळांत हिंदुस्थानानें ह्या मालाच्या आपल्या गरजेच्या १८ टक्के माल सिलोनकडून घेतला. हिंदुस्थान सिलोनकडून कच्चीं व कमावलेलीं कातडींही घेतो. परंतु हल्लीं सिलोनमध्येंच कातड्याच्या सामानाचे कारखाने निघाले असल्यामुळें कातड्यांची निर्यात कमी झाली आहे.

---

## बंगलोरचें गोपाळराव प्रकरण

### घेणेकऱ्यांस रुपयांत ३ पै मिळणार

बंगलोर येथील एका बँक कारकुनानें तीन वर्षेपर्यंत हजारों लोकांना नादीं लावून अखेर डिसेंबर, १९४६ मध्यें दिवाळें काढलें. म्हैसूर संस्थानांतल्या सर्व दर्जाच्या लोकांनीं ह्या गोपाळरावांना खुषीनें दिलेल्या ठेवींची रक्कम ४ कोटी रुपयांवर गेली. श्रीमंतांची हाव असणारांकडून गोपाळराव ३० ते ५० टक्के व्याजाच्या दरानें ठेवी घेत व परत फेडीच्या रकमेचा बिन तारखेचा चेक त्यांना देत. ठेवीदारांना केव्हांहि शंका आली कीं ते चेकवर तारीख टाकून त्यांचे पैसे बँकेंतून काढून घेण्यास मोकळे होते. भरमसाट व्याजाच्या रकमेचे चेक दर तिक दिवशीं वटले जात असत; तेव्हां परतफेडीचे चेक वटविण्यास जाणार कोण ? अखेर धर्मरत्नाकर गोपाळरावांचें दिवाळें निघालें तेव्हां ५५० ठेवीदारांचें त्यांचेकडून २ कोटी रुपये येणें होतें. त्यांच्या रकमेपैकीं रुपयांत ३ पै इतकी परत फेड होईल असा अदाज आहे.

---

### वाई येथील सहकारी सेक्रेटरी ट्रेनिंग क्लासचा अहवाल

सातारा जिल्हा को. सुपरवायझिंग युनियन बोर्डाच्या एज्युकेशन कमिटीच्या विद्यमाने सहकारी सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास वाई येथें १६–१–४८ ते २९–२–४८ अखेर भरविण्यांत आला होता. सदर क्लासचा उद्घाटन समारंभ आमदार पी. पी. ऊर्फ बाबुराव गोखले, बी. ए, कराड, यांचे हस्तें १६–१–४८ रोजीं साजरा करण्यांत आला. या क्लासला सातारा जिल्ह्यांतील विशेषतः वाई, खंडाळा, कराड, या तालुक्यांतील मिळून सुमारें २०–२५ विद्यार्थी हजर होते. क्लासमधील विद्यार्थ्यांना सहकारी कायदा, कानू, पोटनियम, कुळसंरक्षण कायदा, कर्जनिवारण कायदा, सहकारी संस्थांचे जमाखर्च, बँका व त्यांचे व्यवहार इत्यादि विषयांसंबंधी तज्ज्ञ शिक्षकांकडून माहिती दिली. क्लासचे चालक को. ट्रे. इन्स्पेक्टर श्री. डी. बी. निकम, बी. ए. हे होते. सदर क्लासचा विसर्जन समारंभ मे. एस्. व्ही. भीर, असि. रजिस्ट्रार, को. सोसायटीज, सातारा भाग, यांचे हस्तें ता. ३–३–४८ रोजीं मोठ्या थाटानें पार पडला.

---

### पंढरपुरांत परचेस–सेल युनियनची स्थापना

पंढरपूर सांगोला ता. को. परचेस-सेल युनियनची पहिली साधारण सभा ता. २२-२-४८ रोजीं अर्बन बँकेच्या दिवाणखान्यांत करमाळ्याचे रा. सा. गणपतराव पाटील ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. सें. बँकेचे इन्स्पेक्टर श्री. नारायणराव साळुंके ह्यांनीं युनियनच्या पोटनियमांची माहिती सांगितली. सहकारी ट्रे. इन्स्पेक्टर श्री. देशमुख, श्री. बाळासाहेब मोरे, अॅ. डी. सी. ओ. श्री. कुलकर्णी व अध्यक्ष श्री. पाटील ह्यांचींहि समयोचित भाषणें झालीं.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास.' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.